## माहे ०५/२०२४ ते १२/२०२४ रोजी पर्यत लोहमार्ग पुणे जिल्हयाची उत्क्ष्ट कामगिरी/कर्तव्यापलीकडे केलेली उत्कृष्ठ कामगिरी

### १) दामिनी पथक

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>हुद्दा ब. नंबर</th><th>नाव</th><th>केलेली कामगिरी</th></tr>
<tr><td>०१</td><td>म.पो.हवा./१३६१</td><td>बेबी सुदाम थोरात</td><td rowspan="3">दामिनी पथक कर्तव्या दरम्यान लोकलमधुन पडलेल्या महिलेस लोकल गाडीचे खाली जावु न देता प्लॅटफॉर्मवर ओढले<br><br>दिनांक ०२/१०/२०२४ नमुद महिला पोलीस अंमलदार हया शिवाजीनगर ते लोणावळा दरम्यान दामिनी पथक पेट्रोलिंग करीत असताना शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे रात्री १९.१० च्या लोकल गाडीमधून कोणी पडलेचा आवाज आल्याने त्या दोघीनी पळत जाऊन सदर महिला नामे अपूर्वा प्रकाश दीक्षित, वय २९ वर्षे, रा. घोरावाडी लोकल गाडी खाली जाऊ न देता प्लॅटफॉर्मवर ओढले व तिचा जीव वाचविला. व पुढील उपचारकामी तिच्या संमत्तीने तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.</td></tr>
<tr><td>०२</td><td>म.पो.हवा./१३५८</td><td>निशिगंधा शशीकांत आढाव</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
</table>

## २) दामिनी पथक

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>हुद्दा ब. नंबर</th><th>नाव</th><th>केलेली कामगिरी</th></tr>
<tr><td>०१</td><td>मसपोफौ</td><td>लक्ष्मी बाबु कांबळे</td><td rowspan="6">दामिनी पथक कर्तव्या दरम्यान लोकलमधुन पडलेल्या महिलेस लोकल गाडीचे खाली जावु न देता प्लॅटफॉर्मवर ओढले<br><br>दिनांक १५/११/२०२४ नमुद महिला पोलीस अंमलदार हया शिवाजीनगर ते लोणावळा ते लोणावळा दरम्यान दामिनी पथक पेट्रोलिंग करीत असताना शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे महिला नामे समिक्षा संतोष खरात, वय २५ वर्षे, रा. बाणेर यांची बॅग प्लॅटफॉर्मवर विसरली म्हणुन चालु लोकलमधुन उतरून बॅग घेवुन पुन्हा चालु लोकलमध्ये चढत असताना तोल जावुन खाली पडल्या असता दामिनी पथकातील नमुद महीला पोलीस अंमलदार यांनी सदर महिलेस लोकल गाडी खाली जाऊ न देता प्लॅटफॉर्मवर ओढले व तिचा जीव वाचविला. व पुढील उपचारकामी तिच्या संमत्तीने तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.</td></tr>
<tr><td>२</td><td>मपोहवा/१३६२</td><td>कांता जानकु डेंगळे</td></tr>
<tr><td>३</td><td>मपोशि/ १३६१</td><td>पुष्पा अमर सावंत</td></tr>
<tr><td>४</td><td>मपोशि/ १३७९</td><td>पुजा शहाजी धेंडे</td></tr>
<tr><td>५</td><td>मपोशि /१३८२</td><td>मेघा दत्तात्रय पारधी</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
</table>

## ३) दामिनी पथक

| अ.क्र. | हुद्दा ब. नंबर | नाव | केलेली कामगिरी |
|---|---|---|---|
| ०१ | मपोशि १४१० | संतोषी सुग्रीव ढेंबरे | **नुकतीच प्रसुती झालेल्या रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या महिलेस व तिच्या बाळास तात्काळ औषधेपचार कामी रूग्णालयात दाखल कले व जिव वाचविला**<br><br>दिनांक २३/०५/२०२४ मपोशि १४१० ढेंबरे व मपोशि १४६१ बनसोडे हया पुणे ते लोणावळा दरम्यान दामिनी पथक पेट्रोलिंग करीत असताना शिवाजीनगर रेल्वे स्टेशनवर नुकतीच **नुकतीच प्रसुती झालेल्या व रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या महिलेस व तिच्या बाळास** तात्काळ ससुन रूग्णालयात पुढील औषधोपचारा करीता दाखल केले. त्यामुळे महिला व नवजात बालकास नवजीवन मिळाले आहे. |
| ०२ | मपोशि १४६१ | आकांक्षा हनुमंत बनसोडे | |
|  | | | |

## ४) दामिनी पथक

| अ.क्र. | हुद्दा ब. नंबर | नाव | केलेली कामगिरी |
|---|---|---|---|
| ०१ | मपोहवा/१३३५ | ज्योती दिनेश बोरनारे | **दामिनी पथक कर्तव्या दरम्यान आत्महत्या करण्याचे हेतुने मिळून आलेल्या महिलेचे मतपरिवर्तन केले**<br><br>दिनांक ०९/०९/२०२४ नमुद महिला पोलीस अंमलदार हया शिवाजीनगर ते लोणावळा दरम्यान दामिनी पथक पेट्रोलिंग करीत असताना शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे संशयास्पद महिला नामे वैशाली खडजोग, वय १९ वर्षे, रा. अहमदनगर ही घरच्यांसोबत भांडण करून पुणे येथे घर सोडुन निघुन आली तिचे मानसिक संतुलन बिघडल्याने ती शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे आत्महत्या करण्याचे हेतुने आल्याचे तिच्याशी बोलुन समजले. दरम्यान नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी सदर महिलेचे मतपरिवर्तन करून आत्महत्या करण्यापासुन परावृत्त केले व सदर महिलेसतिच्या संमत्तीने तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले. |
| ०२ | मपोहवा/१३०१ | सोनाली अमृतराज पाटील | |
| ०३ | मपोशि/१३५४ | पुनम उमेश रासकर | |
|  | | | |

## ५) सोलापुर लोहमार्ग पोलीस ठाणे

| अ.क्र. | हुद्दा ब. नंबर | नाव | केलेली कामगिरी |
|---|---|---|---|
| ०१ | सपोनि | मच्छिंद्रनाथ जयप्रकाश गुरव | सोलापुर रेल्वे स्टेशन येथे कर्तव्या दरम्यान क्सप्रेसचे मागील जनरल बोगीमधुन पडलेल्या इसमास गाडीचे खाली जावु न देता प्लॅटफॉर्मवर ओढले<br><br>दि.२०.०८.२०२४ रोजी १८.३० वा. सु. एक प्रवाशी नामे मनोज कांबळे वय ३२ वर्ष राह करमाळा जि. सोलापुर हा सोलापुर ते पुणे असा प्रवास करण्यासाठी सोलापुर रेल्वे स्टेशन फलाट नं ०१ वर आलेली गाडी नं ११०२० कोणार्क एक्सप्रेसचे मागील जनरल बोगीत चढत असताना त्याचा तोल जावुन तो गाडी सोबत फरफटत जात असताना ऑन डयुटी पोलीसांनी त्यास पळत जावुन पकडुन बाजुला घेवुन त्याचा जीव वाचवला आहे<br>सदर घटनेचे पेपर मधील बातमी ,सीसीटिव्ही फुटेजचे व्हिडीओ यासोबत जोडले आहे. |
| २ | श्रेणी पोउपनिरी | संजय नामदेव जाधव | |
| ३ | सपोफौ | प्रकाश काकासाहेब कांबळे | |
| ४ | पोहवा/ ६१ | साबीर अहमद मो.समद जरतार | |
| ५ | पोहवा/ ८२ | परमेश्वर सौदागर खरात | |
| ६ | पोशि /४४९ | नंदकुमार सुभाष राठोड | |
| ७ | मपोशि/१४६३ | रूपाली दत्तात्रय सोलनकर | |

er.dainiktarunbharat.com
21 Aug 2024 - Page 7

**क्राईम वृत्त...**



**सोलापूर लोहमार्ग पोलिसांनी वाचविले रेल्वेतील प्रवाशाचे प्राण**

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट -**

सोलापूर लोहमार्ग पोलिसांनी धावत्या रेल्वे गाडीत चढत असताना पाय घसरून खाली पडणाऱ्या रेल्वे प्रवाशाचे प्राण वाचविले. गाडी नं. ११०२० भुवनेश्वर ते मुंबई ही मंगळवारी सायंकाळी सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म नं १ व आलेली होती. ही गाडी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे थांबून मुंबईकडे निघाली असताना गाडीच्या पाठीम गील जनरल बोगीत मनोज कांबळे (वय ३२, रा. करमाळा) हा रेल्वे गाडीत चढत होता. त्यावेळी त्याचा पाय अचानक घसरून तो खाली पडत असताना सोलापूर रेल्वे स्टेशन येथे बंदोबस्तकाम हजर असलेल्या लोहमार्ग पोलिसांनी कांबळे यास लागलीच ओढून सुरक्षित बाहेर काढले व त्याचे प्राण वाचविले. यावेळी गाडीचे गार्ड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळी गाडीचे इमर्जन्सी ब्रेक मारून गाडी थांबविली. बाहेर काढल्यानंतर कांबळे यांनी रेल्वे पोलिसांची आभार मानले व त्यानंतर रेल्वे पोलिसांनी त्यास धीर देऊन गाडीत बसवून सुखरूप पाठवून दिले. यावेळी लोहमार्ग पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ गुरव, पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव, सहायक फौजदार प्रकाश कांबळे, हवालदार साबीर जरतार, परमेश्वर खरात, प्रमोद सुरवसे, नंदकुम